वि.दि.दा. क्र.८७/२०१०

अनंत कुलकर्णी

वि.

आप्पाजी कुलकर्णी मयत वारस वगैरे

**<u>आदेश निशाणी क्र.१२७ आणि नि.क्र.१ वर</u>**

प्रतिवादी क्र.२ यांचे दि.३१.०८.२०१० रोजीचे खरेदीखत बेकायदेशीर आहे असा जाहीर ठराव तसेच वादी यांचा दावा मिळकतमधील हिस्सा वाटप होऊन मिळावा यासाठी हा दावा दाखल करण्यात आलेला आहे. वादी यांनी त्यांचे जादा पुराव्याचे कामी मृत्युपत्रावरील साक्षीदार गोविंद कुंभार यांना साक्षी समन्स पाठवले. त्यांनी हजर होऊन साक्ष देण्यासाठी मुदत मागितली. नंतर ते गैरहजर आहेत. नमुद साक्षीदार हे साक्ष देण्यासाठी उत्सुक नाहीत. परंतु न्यायालयाने दि.२१.११.२०१९ रोजी वादी यांचा साक्षी पुरावा काही नाही असा आदेश केलेला आहे. वादी यांना या प्रकरणात इतरही साक्षीदार यांची साक्ष नोंदवयाची आहे. त्यामुळे न्यायाचे दृष्टीने वादी यांचा साक्षी पुरावा संपला असा झालेला आदेश रदद होऊन त्यांना साक्षी पुरावा देण्यास परवानगी मिळावी यासाठी हा अर्ज देण्यात आलेला आहे.

२. त्यावर प्रतिवादी क्र.१ आणि प्रतिवादी क्र.२ यांनी तीव्र आक्षेप नोंदवला आहे. प्रतिवादी क्र.३ व ४ यांचे विरुध्द हा दावा एकतर्फा चालवण्याचा आदेश करण्यात आलेला आहे. वारंवार व पुरेशी संधी देऊन ही वादी यांनी त्यांचा साक्षी पुरावा दिलेला नाही. वादी हे विनाकारण प्रस्तुत प्रकरण लांबवण्याचा प्रयत्न करत आहे. त्यामुळे अर्ज नामंजुर करण्यात यावा असे त्यांनी नमुद केले.

३. प्रकरण स्थावर मिळकतीबाबतचे आहे. वादी यांनी त्यांची साक्ष नोंदवलेली आहे. येथुन पुढे पुन्हा प्राधान्याने व तातडीने प्रकरण चालवण्यास वादी हे तयार आहेत. त्यामुळे त्यांचा साक्षी पुरावा संपला असा झालेला आदेश रदद करुन त्यांना पुढील साक्षी पुरावा देण्यास परवानगी देणे न्यायाचे दृष्टीने योग्य राहील. त्याचसोबत प्रकरणास झालेल्या विलंबामुळे प्रतिवादी क्र.१ व २ यांना नुकसान भरपाई म्हणुन कॉस्ट रक्कम देण्याचा आदेश करणे आवश्यक आहे. त्यासाठी मी पुढील प्रमाणे आदेश देत आहे.

**आ दे श**

१. अर्ज मंजुर करण्यात येत आहे.

२. प्रतिवादी क्र.१ व २ यांना प्रत्येकी रक्कम रुपये १०००/– कॉस्ट आजचे आज देण्याच्या व प्रकरण तातडीने पुढे चालवण्याच्या अटीवर वादी यांचा साक्षी पुरावा संपला हा आदेश रदद करुन त्यांना पुढील साक्षी पुरावा देण्यास परवानगी देण्यात येत आहे.

Sd/–

दिनांक :०१/०२/२०२०

( श्रीकृष्ण हरिभाऊ इनामदार )
दिवाणी न्यायाधीश व. स्तर, पंढरपूर.

**C E R T I F I C A T E**

I affirm that the contents of this PDF file Judgment/ Order is same word to word as per the original Judgment.

| | | |
|---|---|---|
| a | Name of the Stenographer | : B.R.Kondekar |
| b | Court | : C.J.S.D. Pandharpur. |
| c | Date of Order | : 01.02.2020 |
| d | Order signed by P.O. on | : 01.02.2020 |
| e | Order uploaded on | : 01.02.2020 |